Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 620 – 624

DOI: 10.5281/zenodo.10278899

**Original Research Article**

# महात्मा गांधींचे दारूबंदी संबंधीचे विचार

प्रा. डॉ. टेंकाळे सुवर्णा उमाकांत

विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती ता. अहमद्पुर जिल्हा: लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: suvarnawale61490@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधींनी अस्पृश्यता, स्त्रीयांची स्थिती, गोवधबंदी, आरोग्य, मूर्तीपूजा, स्वच्छता इत्यादी सामाजिक समस्यांबाबत विचार मांडत असतानाच मद्यपान (दारू) या सामाजिक समस्याचा विचार केल्याचे दिसून येते. त्यांचे असे मत होते की, देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक विकासासाठी दारूबंदी आवश्यक आहे म्हणून त्यांनी त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमात दारूबंदीचा सामावेश केलेला होता. गांधी म्हणतात, मद्यपानाने मानव, अहिंसा, सत्य, शांतता इत्यादी गुणांपासून दूर जातो. मद्यपानरूपी राक्षस समाजाला दररोज चढत्या प्रमाणात पोखरीत असतो. भारतासारख्या देशाला तर मद्यपान अत्यंत हानीकारक आहे. गांधींना आलेल्या अनुभवाच्या आधारे ते या निष्कर्षापर्यंत आले होते की, मुठभर श्रीमंत आणि सुशिक्षितांपेक्षा लाखो गरीब लोकच दारूच्या व्यसनाचे बळी आहेत. त्यांचे दारीद्रय, आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी दारूबंदी आवश्यक आहे. गांधीजी त्यांच्या “सपनोंका भारत” या पुस्तकात असं लिहितात की, ‘मला भारत गरीब राहीलेला चालेल पण, आमचे लाखो लोक नशाबाज झालेले मला आवडणार नाहीत. अबकारी उत्पन्नातून शिक्षण चालविण्यापेक्षा दारूबंदीसाठी शिक्षण बंद केले तरी चालेल. दारूबंदीकरीता मला ही किंमत परवडेल.

## उद्दिष्टे

महात्मा गांधींच्या दारूबंदी संबंधीचे विचार जाणून घेणे, विश्लेषण करणे.

## गृहितक

आजच्या काळात महात्मा गांधींच्या दारूबंदीविषयीच्या विचारांची अत्यंत आवश्यकता आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी सामाजिक शास्त्रातील विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संधोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन**

तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोताचा आधार घेऊन गांधींचा दारुबंदी संबंधीचा विचार समाजासाठी कसे उपयुक्त आहेत हे मांडण्याचा प्रयत्न सदरील शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**महात्मा गांधींचे दारूबंदी संबंधीचे विचार**

महात्मा गांधी कोणत्याही प्रश्नाचा समग्र दृष्टीने विचार करतात. गांधी असे म्हणतात की,' मला जर कोणी एका तासाकरीता हिंदुस्थानचा हुकुमशहा नेमले तर मी, प्रथम जी गोष्ट करेन ती म्हणजे नुकसानभरपाई न देता सर्व दारूचे गुत्ते बंद करेन तसेच कारखान्यांच्या मालकांकडून सक्तीने मजुरांच्या निर्वाहाकरीता उत्साहवर्धक व आरोग्यवर्धक खाद्यपदार्थ व पेय मिळू शकतील अशी मनोरंजनगृहे व उपाहारगृहे इत्यादी निर्माण करून घेईन. तसेच आजारी माणसांना वैद्यकीय कारणांसाठी दारू घेणे आवश्यक असेल तर त्याची व्यवस्था करेन.'

**A. दारूबंदी संबंधी युक्तीवाद**

**१. शारीरिक व मानसिक परिणाम**

गांधींच्या मते, मद्यपी व्यक्तीच्या शरीरावर परिणाम होतो. मद्यपानामुळे व्यक्तीच्या सावधानतेवर व एकाग्रतेवर परिणाम होतो. तिची सावधानता व एकाग्रता ढळली की, ती हळूहळू वैफल्यग्रस्त होते. त्यातून तिची लैंगिक भावना अधिक उत्तेजित होते. यातूनच ती न करणारे लैंगिक गुन्हे मद्यसेवनानंतर करते. गांधींच्या मते, मद्यसेवनाचा मद्यपीच्या शरीरावर जसा परिणाम होतो तसा तिच्या मनावरही होतो. त्यामुळे मद्यपी व्यक्तीची मर्मदृष्टी दुबळी होते. तिच्यातील स्वतंत्र विचार करणे व कल्पना करणे या मौलिक मानसिक शक्ती हळूहळू लोप पावतात. तिची विवेकशक्ती क्षीण होते, ज्यामुळे ती शुभ-अशुभ यात भेद करू शकत नाही. याचा परिणाम म्हणून ती नैतिकदृष्ट्या दुर्बल बनते. काही प्रसंगी ती आक्रमक व क्रूर बनते, इतरांचा विनाकारण द्वेश करू लागते. तिची मानसिक खच्चीकरण तिच्या व तिच्या कुटुंबियांसाठी घातक असते. त्यांच्या मते, गुन्हेगार हा इतरांच्या घरावर दरोडा घालित असतो. पण म़द्यपान करणारी व्यक्ती एका अर्थाने स्वत:च्याच कुटुंबियाच्या आयुष्यावर दरोडा घालित असते.

**२. सामाजिक परिणाम**

मद्यसेवनामुळे समाजाचे अस्त्विव धोक्यात येते. मद्यपानामुळे यादव व रोमन साम्राज्य लयास गेले, असे गांधींचे मत होते. मद्यपानामुळे आत्महत्या, घटस्फोट, कौटुंबिक, सामाजिक संघर्ष, स्त्रीयांवरील अत्याचार इत्यादी सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. मद्यसेवनामुळे अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत आहे. मद्यपानामुळे उद्योगातील उत्पन्न

घटत आहे. कारण, त्यामुळे कामगारांची उत्पादनक्षमता कमी होते. कामगार, श्रमाचा पैसा व्यसनात वाया घालवित आहेत. आज तरूणांमध्ये मद्यसेवनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे त्यांच्यातील मौलिक गुण, बुध्दिमत्ता व परिश्रमशीलता यांचा लाभ त्यांना व देशाला होत नाही. तरूण पिढी कमकुवत होत आहे.

**३. आर्थिक जीवनावरील परिणाम**

मद्यसेवनाचा मद्यपीच्या आर्थिक जीवनावरही विपरीत परिणाम होत असतो. त्यामुळे व्यक्ती स्वत:चे शारीरिक व मानसिक आरोग्य हरवून बसते. याचा परिणाम देशातील उत्पादनात घट होण्यात होतो. शासन दारूच्या माध्यमातून महसूल गोळा करीत असते. याचा अर्थ शासन अप्रत्यक्षरित्या सामान्यांचे शोषण करीत असते. कारण, सामान्य माणूस दारूवर अधिक पैसा खर्च करीत असतात.

गांधींच्या मते, मद्यसेवनाचा केवळ वैयक्तिक जीवनावर परिणाम होत नाही तर, त्याचा संपूर्ण समाजजीवनावर परिणाम होत असतो. म्हणून माझ्यामते, दारूबंदी ही नैतिक दृष्टिकोनातून समर्थनीय आहे. मद्यसेवन करणारी व्यक्ती स्वत:च्या आत्म्याला व तिला लाभलेल्या दैवी संपत्तीला कलंक लावीत असते. दारूबंदीचा कार्यक्रम हा व्यक्ती व समाजजीवन शुध्दीकरणाचा मार्ग आहे असे त्यांचे मत होते.

**B. दारुबंदीच्या विरोधातील युक्तीवादाचं खंडण**

१. शासनाने दारूबंदीची सक्ती करू नये, उलट कायद्याने त्यास परवानगी द्यावी असे काहींचे मत आहे. यावर गांधी म्हणतात की, शासन कुंटणखाने चालविण्यास किंवा चोरी करण्यास कायद्याने परवानगी देत नाही तर, दारू सेवनासतरी का द्यावी? म्हणून शासनाने मद्यसेवनास संमती द्यावी, हा युक्तीवाद हास्यास्पद आहे.

२. दारूबंदीमुळे शासनाचा महसूल बुडतो, असा काही लोक युक्तीवाद करतात. गांधींच्या मते, शासनाने दारूबंदीच्या प्रश्नाकडे केवळ महसूलप्राप्तीचे साधन या दृष्टीने पाहू नये तर, या प्रश्नाकडे सर्वसामान्य लोकांचे नैतिक अध:पतन करणारा हा प्रश्न आहे. अशा व्यापक दृष्टीने पाहिले पाहिजे.

३. दारूबंदीमुळे बेकारी वाढेल. असा युक्तीवाद काहीजण करतात. गांधींच्या मते, दोन वाईटांमधून एका वाईटाची निवड करायची झाल्यास दारूपेक्षा बेकारीची निवड केली पाहिजे. अशा बेकारांना ग्रामोद्योग व लघुद्योग सुरू करून द्यावेत.

४. दारूबंदीमुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते असे काहींचे मत आहे. यावर गांधीजी म्हणतात, 'स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. आणि स्वातंत्र्य इतरांच्या स्वातंत्र्याच्या आड येत असेल तर, ते नियंत्रित करणे गरजेचे आहे.'

५. दारूबंदीमुळे पोलिसांच्या हातात सत्ता जाते. ते सत्तेचा दुरूपयोग करू शकतात. त्यातून भ्रष्टाचार वाढेल. बेकायदेशीर व गावठी मद्यविक्रीत वाढ होईल असा युक्तीवाद काहीजण करतात. यावर गांधी असे म्हणतात की, ' जागरूक लोकमत या सर्व प्रश्नांची काळजी घेईल.'

### C. दारूबंदीसाठी गांधींनी सांगितलेले उपाय

महात्मा गांधी म्हणतात, भारतासारख्या देशाने संपूर्ण दारूबंदी करून इतर जगाला आदर्श घालून द्यावा. चोरीपेक्षा मद्यपान हा भयंकर गुन्हा आहे. दारू गाळणाऱ्यास आणि पिणाऱ्यास शिक्षा दिली जावी. 'हरीजन' मधील लेखात गांधी म्हणतात, "मद्यपानाची सवय असलेल्या व्यक्तीच्या मदतीने पूर्ण स्वराज्याची प्राप्ती होणे अशक्य आहे. असा मनुष्य नैतिकतेपासून शेकडो मैल लांब गेलेला असतो."

१. शासनाने दारूबंदीचा कठोर कायदा करून त्यांची अंमलबजावणी करावी. शासनाने संपूर्ण देशात एकाच वेळी दारूची दुकाने बंद करावीत. म्हणजे त्याचा चांगला परिणाम दिसून येईल. शासनाने या कार्यक्रमाकडे सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने पाहून तो कर्तव्यभावनेने अंमलात आणावा. दारूबंदीविषयी प्रसिध्दीमाध्यमातून प्रचार व प्रसार करावा.
२. गांधींच्या मते समाजातील डॉक्टरांनी त्यांच्या ज्ञानाचा व तज्ज्ञतेचा उपयोग करून दारूबंदीसाठी संशोधन करावे. त्यावर विविध उपाय शोधून काढावेत. त्यांनी लोकांना निरोगी आरोग्याचे नियम व मद्यपानामुळे शरीरावर व मनावर कोणते दुष्परिणाम होतात ते समजावून सांगावेत. डॉक्टर तज्ज्ञ असल्यामुळे त्यांच्या विचारावर व सल्ल्यावर लोक विश्वास ठेवतात. तरूणांनी त्यांच्या सुट्टीच्या काळात ग्रामीण व शहरी भागात दारबंदीसाठी अभियान सुरू करावेत. मद्यपानापासून होणारे परिणाम समजावून सांगावेत. स्त्रीयांनी त्यांच्या कुटुंबातील व्यसनी व्यक्तीला योग्य सल्ला दिल्यास व त्यांची प्रेमाने सेवा केल्यास त्याचा निश्चित अनुकूल परिणाम होतो. स्त्रीयांनी संघटीत होऊन अहिंसक मार्गाने दारूच्या दुकानांसमोर धरणे धरावीत.
३. सामाजिक कार्यकर्त्यांनी लोकांच्या घरी जावून मद्यपानाचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगावेत. त्यांनी दारू विक्रेत्यांना हा व्यवसाय बंद करण्याची विनंती करावी. दारू उत्पादकांना हा व्यवसाय समाज व राष्ट्र विकासाला कसा घातक आहे, हे समजावून सांगावे. अनैतिकता वाढविणारा हा व्यवसाय सोडून देण्यासाठी त्यांचे मन:परिवर्तन करावे.

### निष्कर्ष

महात्मा गांधी भारतातील दारूबंदीचा पुरस्कार करणारे एकमेव राजकीय नेते व विचारवंत होते तसेच दारूबंदीचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. वाटेल ती किंमत देऊन त्यांना दारूबंदी हवीच होती. दारूबंदीच्या प्रश्नांकडे त्यांनी शारीरिक, मानसशास्त्रीय, सामाजिक आणि नैतिक दि्ष्टकोनातून विचार केलेला दिसून येतो. दारूमुळे तरूण पिढी शारीरिक व मानसिकदृष्ट्या कमकुवत बनत आहे. ही धोकादायक स्थिती आहे. दारूबंदीच्या समर्थनामागे त्यांची स्पष्ट नैतिक भुमिका असल्याचे जाणवते. त्यांच्या विचारांवरून असे दिसून येते की, दारूच्या महसूलातून मिळणाऱ्या आर्थिक लाभापेक्षा समाजाचे होणारे नैतिक नुकसान अधिक आहे. दारूबंदी संबंधीचे त्यांचे विचार मानवासमोरील एका गंभीर प्रश्नाची जाणीव करून देणारे आहेत. आज काही ठिकाणी मद्यपानाला प्रतिष्ठा प्राप्त होत आहे हा चिंतेचा विषय आहे. याला आपण वेळीच आळा घालू शकलो नाही तर, मोठा धोका निर्माण होऊ शकतो. महात्मा गांधींचे दारूबंदी संबंधीचे विचार

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात केवळ आदर्शवादी वा अव्यवहारी वाटण्याची शक्यता आहे. परंतु हे मात्र खरे आहे की, या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी गांधी विचारांची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची**


१. महात्मा गांधी मेरे सपनोंका भारत: महात्मा गांधी

२. भारतीय राजकीय विचारवंत: बी.वाय.कुलकर्णी

३. भारतीय राजकीय विचार: प्रा. किसन चोपडे

४. महात्मा गांधी यांचे वैचारीक तत्त्वज्ञान: डॉ. सुवर्णा उमाकांत टेंकाळे (वाले)

५. Relevance of Mahatma Gandhi in Today's World: Chief Editor Mr. Arun B. Godam.